PORTRAIT ARTISTS' GROUP

विष्णू वामन ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट च्या "विवा इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाईड आर्ट "व **पोर्ट्रेट आर्टिस्ट्सचा ग्रुप** यांच्या सयुंक्त विद्यमाने , सातव्या वार्षिक स्पर्धेचे 25 जून व 26 जून विवा इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाईड आर्ट, शिरगांव येथे आयोजन केले आहे .

भारतातील वास्तववादी कलेला प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेतील स्पर्धक हे वर्षभराच्या प्रत्येक महिन्यातील झालेल्या स्पर्धेतील, स्पर्धकांमध्ये हि स्पर्धा प्रत्येक वर्षी आयोजित केली जाते.

कार्यक्रमाची सुरवात माननीय श्रीमती प्रविणा हितेंद्र ठाकूर (विश्वस्त, विष्णू वामन ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रथम महिला महापौर) यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. या सोहळ्यात पोर्ट्रेट आर्टिस्ट्स ग्रुप चे अध्यक्ष आणि जगप्रसिद्ध कलावंत श्री वासुदेव कामथ, १२ स्पर्धक चित्रकार / शिल्पकार उपस्थित होते. याच बरोबर विविध कलाकार, संस्थेचे पधादिकारी, विद्यार्थी, शिक्षक , कलाप्रेमी व कलाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती संगिता सं. पाटील उपस्थित होत्या.

सर्व 12 अंतिम स्पर्धकांना बक्षिसे दिली जातील, सर्वोच्य स्पर्धा विजेत्यास ग्रैंड ट्रॉफी आणि पुरस्कार दिला जाईल. या व्यतिरिक्त गुणवत्ता प्रमाणपत्रासाठी निर्णायक ठरलेल्या २० स्पर्धकांचाही या कार्यक्रमात सत्कार करण्यात येणार आहे . सुप्रसिद्ध अभिनेते आणि पद्मश्री पुरस्कार विजेते श्री. मनोज जोशी या पुरस्कार सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत . मा हितेंद्रजी ठाकूर, आमदार हेही सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत . पोर्ट्रेट आर्टिस्ट्सचा ग्रुप चे अध्यक्ष आणि जगप्रसिद्ध कलावंत श्री वासुदेव कामथ शेवटच्या दिवशी मार्गदर्शनपर व्याख्यान देतील.

कलेच्या विद्यार्थ्यांना ,वसई- विरार मध्ये असलेल्या चित्रकारांसाठी व कला प्रेमींसाठी स्पर्धाचे कलास्वाद घेण्यास सर्वांसाठी खुले आहे.

Late Shri Vishnu Waman Thakur Charitable Trust's
VIVA INSTITUTE OF APPLIED ART
Approved by A. I. C. T. E., Affiliated to University of Mumbai
PORTRAIT ARTISTS' GROUP
7th ANNUAL PORTRAIT COMPETITION
25th & 26th June 2022